॥ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ॥

(१८५३ - १९२०)

पुण्यतिथीनिमित्ताने सङ्क्षिप्त परिचय

- भारतातील देशभक्तांचे मेरूमणी.
- मूळ गांव चिखलगांव (जि. रत्नागिरी).
- डेक्कन कॉलेज, पुणे येथून बी. ए. १८७६ , एल. एल. बी. १८७९.
- विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे मार्गदर्शन.
- राष्ट्रीय शिक्षणासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात पुढाकार.
- १८९२ साली सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरुवात.
- मुख्य हेतू लोकरंजन, लोकसंग्रह, लोकशिक्षण व लोकजागृतीचे कार्य.
- "केसरी" व "मराठा" या वृत्तपत्रांची स्थापना १८८१.
- १९०५ च्या वंगभंग चळवळीत मोठा भाग.
- स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व परकीय मालावर बहिष्कार ही लोकप्रिय चतु:सुत्री.
- "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी
मिळवणारच" हा त्यांचा मंत्र सर्वतोमुखी झाला.
- काँग्रेसमधील जहाल पक्षाचे नेतृत्व.
- १९०८ मध्ये बाँबच्या अत्याचारासंबंधी "केसरी"
मध्ये लिहिल्यामुळे राजद्रोहाचा खटला, सहा वर्षांची
शिक्षा व ब्रह्मदेशातल्या मंडाले शहरात तुरुंगवास.
- मंडालेत गीतेचा कर्मयोगपर अर्थ लावून "गीतारहस्य" ह्या सुप्रसिद्ध ग्रंथाचे लेखन.
- १९१६ मध्ये बॅरिस्टर जीनांशी एक करार करून
मुसलमानांशी सख्य घडवून आणण्यासाठी एक मोठा प्रयत्न केला.
- होमरूल संस्थेची स्थापना.
- टिळकांचे कर्तृत्व, विचार, नेतृत्व, मार्गदर्शन सर्व भारताला विलक्षण चैतन्यदायी ठरले.
- कवि, लेखक, पत्रकार, नाटककार, क्रांतिकारक,
इतिहास संशोधक, कोशकार या सर्वांचेच टिळक स्फूर्तिस्थान
व आम भारतीय जनतेचे लोकमान्य. महाराष्ट्रात "तेल्या तांबोळ्याचे पुढारी".
- टिळक कालखंडाला टिळक युग म्हणतात (कर्तृत्वावरून).
- प्रमूख ग्रंथ, गीतारहस्य, ओरायन, आर्क्टिक होम ऑफ
वेदाज, वेदिक क्रोनोलॉजी ॲन्ड वेदांत ज्योतिष.
- त्यांच्या मुंबईला चौपाटीवर झालेल्या अंत्यविधीसमयी
आदरांजली वाहण्यासाठी महात्मा गांधी प्रमूख वक्ते.
- गांधींनी टिळक स्वराज्यफंड उभारला त्यावेळी बालगंधर्व व केशवराव भोसले यांनी संयुक्तपणे केलेल्या "मानापमान" या नाटकाचा प्रयोग सर्व महाराष्ट्रात गाजला.

संदर्भ: असा हा महाराष्ट्र, १९९३.
संकलक: वसंत राजाराम काकिर्डे
सहाय्यक:
श्रीकृष्ण अनंत पंडित (मनुकाका),
मधुसूदन शंकर जोशी (दादा),
दोघे वॉशिंग्टन डी. सी. अमेरिका स्थाईक.